# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 20 June 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २० जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

*ठळक बातम्या*

- **खरीप हंगामासाठी १४ पिकांसाठीच्या किमान आधारभूत किंमतीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदराच्या उभारणीलाही मान्यता**
- **युजीसी–नेट २०२४ परीक्षा रद्द करण्याची केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची घोषणा**
- **प्रत्येक जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विकासाचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता विकसित मराठवाडा २०४७ या परिषदेतून व्यक्त**

**आणि**

- **टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा अफगाणिस्तानसोबत सामना**

***सविस्तर बातम्या***

खरीप हंगामासाठी १४ पिकांसाठीच्या किमान आधारभूत किंमतीला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. या मध्ये धान, कापूस, ज्वारी, नाचणी, बाजरी, मका, मूग, तूर आणि उडीद आदी पिकांचा समावेश असून, उत्पादन खर्चाच्या तुलनेत ही किंमत किमान ५० टक्क्यांनी अधिक असेल याची

काळजी घेतली असल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं. यामुळे शेतकऱ्यांना एकूण दोन लाख कोटी रुपयांचा लाभ मिळेल, असा विश्वास, त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदराच्या उभारणीलाही केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. यासाठी ७६ हजार २०० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित असून, या निर्णयामुळे १२ लाख रोजगार निर्माण होतील, असं वैष्णव यांनी सांगितलं. काम पूर्ण झाल्यानंतर हे बंदर जगातल्या पहिल्या दहा बंदरांपैकी एक असेल. या प्रकल्पात एक हजार मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल्स, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक तटरक्षक धक्का आणि चार बहुउद्देशीय धक्के यांचा समावेश असेल.

****

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं प्राध्यापक पात्रतेसाठीची युजीसी-नेट २०२४ परीक्षा रद्द करण्याची घोषणा केली आहे. परीक्षेतल्या गैरप्रकारांसदर्भात भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रकरणाची चौकशी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आली आहे. परीक्षेच्या नवीन तारखेविषयी लवकरच कळवण्यात येईल, असं मंत्रालयानं सांगितलं आहे. *s*

****

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेना पक्षाचा ५८ वा वर्धापन दिन काल साजरा झाला. यानिमित्त पक्षाच्या वतीनं, काल मुंबईत मेळावे घेण्यात आले. शिवसेनेचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वरळीत तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी माटुंगा इथल्या षण्मुखानंद सभागृहात कार्यकर्त्यांना संबोधित केलं.

****

दिव्यांग शिक्षकांच्या समायोजनासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे, तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राष्ट्रीय दृष्टीहीन संघांच्या निवेदनाच्या अनुषंगानं काल मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि शिक्षण विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी शेतकऱ्यांच्या अडचणींचा सखोल अभ्यास करण्यात येईल, असं सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी सांगितलं आहे. ते काल मुंबईत यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. शेतकऱ्यांचं समाधान झाल्याशिवाय भूसंपादनाची प्रक्रिया करणार नाही आणि आवश्यकतेनुसार शेतकऱ्यांसमवेत बैठकांचं आयोजन करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या आणि केंद्रातल्या भाजप प्रणीत सरकारच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्या वतीनं उद्या २१ तारखेला राज्यातल्या सर्व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी ‘चिखल फेक‘ आंदोलन केलं जाणार आहे. सरकारचं शेतकरी-कष्टकरी-अल्पसंख्याक याबाबतचं धोरण, स्पर्धा परीक्षांची अनियमितता, नीट परीक्षेतले कथित गैरप्रकार, शेतमालाला हमीभाव आदी मुद्द्यांवर हे आंदोलन केलं जाणार असल्याचं काँग्रेसकडून सांगण्यात आलं आहे.

****

इतर मागासवर्ग - ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं उपोषणाला बसलेले, राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या समर्थनार्थ, परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड इथं तहसील कार्यालयासमोर काल निदर्शनं करण्यात आली. हाके यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातून ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने वडीगोद्रीत दाखल झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दहावा आंतरराष्ट्रीय योगदिन उद्या साजरा होत आहे. योग हा निरंतर अभ्यासाचा विषय असल्याचं, धाराशिव जिल्ह्यातल्या कळंब इथले शशीकुमार भातलवंडे यांनी दाखवून दिलं आहे. २००५ पासून त्यांनी योग साधना करत, आतापर्यंत ५०० योग प्रशिक्षकांना तयार केलं असून दोन लाख विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण दिलं आहे. त्यांच्या कार्याचा आमचे वार्ताहर देविदास पाठक यांनी घेतलेला आढावा,

***Byte…***

****

युवकांनी योग आत्मसात करून योगाचा प्रचार करावा, असं मत, माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केलं आहे. नांदेड इथं मल्टीमिडीया चित्रपट प्रदर्शनात ते बोलत होते. हे प्रदर्शन उद्यापर्यंत सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत

सर्वांसाठी खुलं राहणार आहे, प्रदर्शनस्थळी योग शिबिराचं आयोजनही करण्यात आलं आहे.

****

लातूर शहरात जिल्हा क्रीडा संकुलात जिल्हा प्रशासनाच्यावतीनं उद्या योगाभ्यास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, या कार्यक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत.**

****

लातूर इथं जिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी कृषी महाविद्यालयास तीन कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये वर्ग करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. यासंदर्भातला शासन निर्णय काल जारी करण्यात आला. लातूर शहराजवळील कृषी महाविद्यालयाच्या १० एकर जागेत हे जिल्हा रुग्णालय उभारण्यात येणार आहे.

****

जागतिक सिकलसेल दिनानिमित्त काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात चौका या गावातल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर यांनी यावेळी बोलतांना, नागरिकांनी रक्ततपासणी करून या रोगाच्या एका पिढीतून दुसऱ्या पिढीत होणाऱ्या प्रसाराला आळा घालण्याचं आवाहन केलं...

***Byte…***

****

सर्वसमावेशक विकासाच्या नियोजनासाठी 'जिल्हा' हा महत्त्वाचा घटक मानून, प्रत्येक जिल्ह्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विकासाचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी यांनी व्यक्त केली आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं 'मित्र', महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या 'विकसित मराठवाडा २०४७' या एक दिवसीय विकास परिषदेत परदेशी बोलत होते. या कार्यक्रमाला प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

****

टी – ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना अफगाणिस्तानसोबत होणार आहे. बार्बाडोस इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. या स्पर्धेत सध्या वेस्ट इंडिज आणि इंग्लंड यांच्यात सामना सुरु आहे.
दरम्यान, काल झालेल्या सुपर एट मधल्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं अमेरिकेचा १८ धावांनी पराभव केला.

****

महिला क्रिकेटमध्ये काल बंगळुरु इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा चार धावांनी पराभव केला. भारतीय महिला संघानं प्रथम फलंदाजी करत ३२६ धावांचं आव्हान दिलं. प्रत्युत्तरादाखल दक्षिण आफ्रिकेचा संघ ३२१ धावात सर्वबाद झाला. या विजयासोबतच भारतानं तीन सामन्यांच्या मालिकेत दोन – शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे.

****

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यात धारासूर इथं वीज कोसळून मरण पावलेले अक्षय राठोड आणि येळेगाव इथले नरेंद्र शेळके यांच्या वारसांना, राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून, प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत देण्यात आली. आमदार रत्नाकर गुट्टे आणि उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या हस्ते काल संबंधितांच्या कुटूंबियांना मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले.

****

धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आलेली मराठवाडा एक्सप्रेस पूर्ववत नियमित वेळेवर धावणार आहे. तपोवन आणि नरसापूर एक्सप्रेसच्या वेळांमध्ये देखील बदल करण्यात आला होता, या गाड्याही वेळेवर धावणार असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाकडून कळवण्यात आलं आहे.

****

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना आणि इंडीयन ऑईल यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात येरवडा मध्यवर्ती कारागृहात द्वितीय ‘चेस फॉर फ्रीडम’ या आंतरराष्ट्रीय परिषदेला कालपासून प्रारंभ झाला. राज्यातल्या प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करण्यासह, यामध्ये महिला बंदिवानांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात येईल, असं कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी सांगितलं.

****